आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार दिनांक २९ एप्रिल २०२६

ठळक बातम्या

1. **महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर; सहा एआय उत्कृष्टता केंद्र आणि पाच एआय इनोव्हेशन शहरांची स्थापना होणार.**
2. **उच्च माध्यमिक परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.**
3. **विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी भाजपतर्फे पाच उमेदवारांची यादी जाहीर, नागपुरातून संजय भेंडे यांना संधी.**
4. **राज्यात उष्णतेची लाट; अकोला जिल्ह्यात उष्माघाताच्या सर्वाधिक ७२ रुग्णांची नोंद.**

मंत्रिमंडळ निर्णय

राज्य शासनानं महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत मंत्रिमंडळाची बैठक झाली. या धोरणांतर्गत राज्यात दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक होणार असून दीड लाखांपेक्षा जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. राज्यभरात सहा एआय उत्कृष्टता केंद्रांची स्थापन होणार असून पाच एआय इनोव्हेशन शहरांची स्थापना करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. याशिवाय लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या प्रख्यात संस्थेत भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही या बैठकीत झाला. राज्यात तीनशे कोटी वृक्ष लागवडीकरता महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम हाती घेतली असून हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना केली जाणार आहे. त्याचप्रमाणे राज्यातल्या उच्च माध्यमिक परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे. आता दिव्यांग विद्यार्थ्यांना विद्यापीठ, परीक्षा बोर्ड, संस्थेला भरावे लागणारे शुल्क, प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, नोंदणी, ग्रंथालय, नियतकालिकांसाठी, आणि वैद्यकीय तपासणीसाठी शुल्क मिळणार आहे. आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थाद्वारा

चालविल्या जाणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १२ आणि २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतरची दोन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास देखील मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

विधानपरिषद उमेदवारी

विधानपरिषदेच्या ९ जागांसाठीच्या आगामी निवडणुकीसाठी भाजपाने पाच उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांचा समावेश आहे. भाजपाचे राष्ट्रीय महासचिव अरूण सिंह यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. १३ मे ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह ९ जण निवृत्त होत आहेत. त्याआधी १२ मे ला विधानपरिषदेची निवडणूक होणार आहे. विधानपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून आज अधिकृत नावाची घोषणा करण्यात येईल आणि उद्या उमेदवारी अर्ज भरला जाईल, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली. पक्षाच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत राष्ट्रवादीच्या मुख्य समितीची बैठक झाली, त्यानंतर तटकरे यांनी ही माहिती दिली. संख्याबळानुसार राष्ट्रवादीकडे एकच जागा असून योग्य उमेदवाराला संधी दिली जाईल, असं त्यांनी सांगितलं. दरम्यान संजय भेंडे यांच्या निवडीनंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. सहकार क्षेत्रातील प्रश्नांना वाचा फोडणे ही आपली प्राथमिकता असेल, असं भेंडे यांनी सांगितलं.

उबाठा उमेदवार

अंबादास दानवे हे महाविकास आघाडीचे विधान परिषदेचे उमेदवार असतील. उद्या ११ वाजता ते उमेदवारी अर्ज दाखल करतील. शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दानवे यांच्या नावाची घोषणा केली आहे अशी माहिती नेते संजय राऊत यांनी सोशल मीडिया पोस्ट द्वारे दिली.

मेजर जनरल विवेक त्यागी

नागपूर हे देशाचे मध्यवर्ती ठिकाण असून या शहरात राष्ट्रीय छात्र सेना -एनसीसी उत्कृष्टता केंद्र तसेच ड्रोन ट्रेनिंग अकॅडमी स्थापन करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत

असं एनसीसीचे अतिरिक्त महासंचालक विवेक कुमार त्यागी यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं.

मेजर जनरल विवेक त्यागी हे आज पासून 1 मे पर्यंत नागपूर ग्रुप एनसीसीच्या वार्षिक प्रशासकीय पाहणीसाठी नागपुरात आले आहेत. राष्ट्रीय छात्र सेनेसाठी राज्यामध्ये पायाभूत सुविधा तसच प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी आपण राज्य शासनाकडे पाठपुरावा करत आहोत. छात्र सेनेच्या विस्तारासाठी महाराष्ट्रातील दुर्गम भागातील शाळा महाविद्यालयात संपर्क कार्यक्रमाद्वारे दीड लाख कॅडेटचा टप्पा आपण गाठू असा विश्वास त्यागी यांनी व्यक्त केला.

नरेंद्र दाभोळकर- बार बेंच

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणातील दोषी शरद कळसकर याला मुंबई उच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि आर. आर. भोसले यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. पुणे सत्र न्यायालयाने मे महिन्यात शरद कळसकर आणि सचिन अंदुरे यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

महत्वाची सूचना

आकाशवाणी नागपूर केंद्राच्या 585 किलो हर्ट्स आणि विविध भारती नागपूर केंद्राच्या शंभर पूर्णांक सहा मेगाहर्टसवरून दररोज सायंकाळी ६ वाजता प्रसारित होणारे प्रादेशिक बातमीपत्र दिनांक एक मे 2026 पासून सहा वाजून पाच मिनिटांनी प्रसारित होईल. त्याचप्रमाणे विविध भारतीच्या नागपूर केंद्रावरून सायंकाळी सहा वाजून 15 मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या ठळक बातम्या 1 मे पासून सायंकाळी सहा वाजून 58 मिनिटांनी प्रसारित केल्या जातील.

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातील वाळू उत्खनन आणि विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी अवैध वाळू उपशावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. त्यानुसार ८ एप्रिल २०२५ च्या वाळू धोरणात काही महत्त्वाचे बदल केले आहेत. शासन निर्णयानुसार, वाळूची अवैध वाहतूक रोखण्यासाठी तालुका आणि उपविभाग

स्तरावर विशेष भरारी पथके नेमण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या पथकांमध्ये महसूल विभागासोबतच इतर विभागांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचाही समावेश असेल. नदी आणि खाडी पात्रातील वाळू गटांसाठी भौगोलिक परिस्थितीचा विचार करून ई-लिलाव पद्धत राबवली जाईल. या लिलावाचा कालावधी १ वर्ष किंवा वाळू साठा संपेपर्यंत असेल.

बुलढाणा सिंचन

देऊळगाव राजा तालुक्यातील पांगरीवाडी पाटाला राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे पांगरीवाडी परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा तसेच ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी बुलढाणा जिल्ह्यातील या कामाला हिरवी झेंडी देत VIDC नागपूरला तातडीने सर्वेक्षण करून काम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता

वर्धा जिल्ह्यात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत ६७ गरजू रुग्णांना सुमारे ६३ लक्ष ४० हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. तर भंडारा जिल्ह्यात 61 रुग्णांना सुमारे 53 लाख 75 हजार रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली. हृदय, कर्करोग, किडनी, बोन मॅरो प्रत्यारोपणासह २० गंभीर आजारांच्या उपचारांसाठी ही मदत देण्यात येत आहे. गरजू रुग्णांनी मदतीसाठी 1800 123 2211- १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केलं आहे.

विशेष प्राणीगणना

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प इथं बुद्ध पौर्णिमेनिमित्त १ मे रोजी मचाणावरून विशेष प्राणीगणना आयोजित करण्यात आली आहे. ताडोबाच्या बफर क्षेत्रातील ५७ लोखंडी मचाणांवर दोन प्रगणक रात्रभर बसून वन्यप्राण्यांची नोंद करणार असून, कोअर क्षेत्रात वन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी गणना करतील. या उपक्रमासाठी ऑनलाइन नोंदणी पूर्ण झाली असून प्रति व्यक्ती साडेतीन हजार रुपये शुल्क ठेवण्यात आलं आहे. १ मे रोजी सायंकाळी ४ वाजता मचाणावर चढल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता खाली उतरायचे आहे.

नागपूर-मडगाव रेल्वे

रेल्वे मंत्रालयानं नागपूर-मडगाव दरम्यान धावणाऱ्या विशेष गाडीचे नियमितीकरण करत तिला आता 11203/11204 नागपूर-मडगाव एक्सप्रेस म्हणून मान्यता दिली आहे. ही द्वि-साप्ताहिक गाडी नागपूरहून बुधवार आणि शनिवार रोजी दुपारी 3 वाजून पाच मिनिटांनी सुटून मडगावला दुसऱ्या दिवशी सायंकाळी पावणे सहा वाजता पोहोचेल. मडगावहून गुरुवार आणि रविवार रोजी रात्री 8 वाजता सुटणारी गाडी नागपूरला दुसऱ्या दिवशी रात्री साडे ९ वाजता येईल. गाडीला वर्धा, अकोला, भुसावळ, नाशिक रोड, पनवेल, रत्नागिरी, कणकवली, सावंतवाडी रोड आदी महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

हवामान

राज्यात विशेषत: विदर्भात उष्णतेची लाट असून, अकोला जिल्ह्यात आतापर्यंत उष्माघाताच्या सर्वाधिक ७२ रुग्णांची नोंद झाली आहे. ५५ रुग्णांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं असून, उर्वरित रुग्णांवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत अशी माहिती अकोल्याचे आरोग्य उपसंचालक सुशील वाघचौरे यांनी दिली. आज अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला होता. तर चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आज दुपारी अडीच वाजता नोंदवण्यात आलेल्या तापमानानुसार चंद्रपूर इथं44.4,गडचिरोली इथं 44.2, वर्धा इथं 43.8,अकोला इथं 43.5, नागपुरात 43.4 तर अमरावती इथं 43 पूर्णांक २ दशांश अंश तापमानाची नोंद झाली आहे.